देवतांची उपासना : दत्त – खंड १

# दत्त

## (शास्त्रीय विवेचन आणि उपासना)

मराठी (Marathi)


संकलक

हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**पू. संदीप गजानन आळशी**



**सनातन संस्था**




卐 सनातनच्या ग्रंथांची भारतातील भाषांनुसार संख्या 卐

मराठी ३४३, इंग्रजी २०१, कन्नड १९६, हिंदी १९५, गुजराती ६८, तेलुगु ४५, तमिळ ४३, बंगाली २९, मल्ल्याळम् २३, ओडिया २२, पंजाबी १३, नेपाळी ३ अन् आसामी २

**ऑक्टोबर २०२३ पर्यंत ३६४ ग्रंथांच्या १३ भाषांत ९४ लाख ४६ सहस्र प्रती प्रसिद्ध !**

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय



१. अध्यात्मप्रसारार्थ ‘सनातन संस्थे’ची स्थापना

२. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी ‘गुरुकृपायोग’ या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून २१.११.२०२३ पर्यंत १२७ साधक संत झाले, तर १,०४७ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू आहे.

३. आचारधर्मपालन, देवता, साधना, आदर्श राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विविध विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती

४. हिंदुत्ववादी नियतकालिक ‘सनातन प्रभात’चे संस्थापक-संपादक

५. धर्माधिष्ठित अशा हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

६. ‘हिंदु राष्ट्रा’च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्ववादी आदींचे संघटन आणि त्यांना आध्यात्मिक स्तरावर दिशादर्शन!

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !

स्थूल देह असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वा ठायी ।।
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ।। – जयंत बाळाजी आठवले
१५.५.१९९६

## पू. संदीप गजानन आळशी यांचा परिचय



सनातनच्या ग्रंथांच्या निर्मितीची सेवा करण्यासह राष्ट्रजागृती आणि धर्मप्रसार करणारे प्रसारसाहित्य (उदा. सनातन पंचांग, धर्मशिक्षण फलक इत्यादी) यांसाठी लेखन करतात. साधना, राष्ट्र अन् धर्म यांसंबंधी नियतकालिक 'सनातन प्रभात'मधून प्रबोधनपर लेखनही करतात.

---

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | अर्थ | ९ |
| २. | इतर काही नावे (दत्तात्रेय, अवधूत, दिगंबर, श्रीपाद, वल्लभ) | ९ |
| ३. | जन्माचा इतिहास | १२ |
| ४. | गुरुतत्त्व (दत्ततत्त्व) हे ब्रह्मा, विष्णु आणि महेश या तीन तत्त्वांनी मिळून निर्माण होणे | १४ |
| ५. | दत्ताचे गुरु आणि उपगुरु | १४ |
| ६. | वैशिष्ट्ये    ७. कार्य | २५ |
| ८. | अवतार    ९. परिवाराचा भावार्थ | ३५ |
| १०. | दत्तलोक    ११. मूर्तीविज्ञान | ३७ |
| १२. | सनातन-निर्मित दत्ताचे सात्त्विक 'चित्र' आणि 'नामजप-पट्टी' | ४९ |
| १३. | उपासना | ५५ |
| १४. | पूर्वजांना गती प्राप्त करून देणारा दत्ताचा नामजप / उपासना ! | ७१ |
| १५. | दत्ताच्या उपासनेने वाईट शक्तींच्या त्रासांपासून रक्षण होणे | ८५ |
| १६. | दत्तसंप्रदाय (नाथसंप्रदाय, महानुभावसंप्रदाय आदी) | ८६ |

१७. प्रमुख तीर्थक्षेत्रे आणि त्यांची वैशिष्ट्ये ८९

१८. प्रमुख ग्रंथ (दत्तपुराण, अवधूतगीता, श्री गुरुचरित्र आदी) ९१

१९. अनुभूती ९२

卐 **प्रस्तुत ग्रंथाचे असामान्यत्व लक्षात घ्या !** ९९

卐 **दत्ताची आरती (अर्थासह)** १०२

卐 **संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती** १०५

---

**टीप :** ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या ‘सच्चिदानंद परब्रह्म’ या उपाधीविषयी विवेचन !

१३.७.२०२२ पासून ‘सप्तर्षी जीवनाडीपट्टी’च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना ‘सच्चिदानंद परब्रह्म’ ही उपाधी लावण्यात येत आहे. त्यापूर्वी त्यांना ग्रंथांमध्ये ‘प.पू.’ आणि ‘परात्पर गुरु’ या उपाध्यांनी संबोधले आहे. यानुसार ग्रंथाच्या मुखपृष्ठावर आणि ग्रंथात तसा तसा उल्लेख केला आहे.

---

## सनातनच्या दोन सद्गुरूंच्या नावांच्या आधी विशिष्ट आध्यात्मिक उपाधी लावण्यामागील कारण

जीवनाडीपट्टी–वाचनाद्वारे सप्तर्षींनी केलेल्या आज्ञेनुसार १३.५.२०२० पासून सद्गुरु (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ यांना ‘श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ’ आणि सद्गुरु (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ यांना ‘श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ’ असे संबोधले जात आहे. या संतद्वयी सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी आहेत.

## मनोगत

बहुतेक दत्तभक्तांना दत्ताविषयी जी अल्पस्वल्प माहिती असते, ती बहुधा त्यांनी वाचलेल्या किंवा ऐकलेल्या कथांमुळे असते. अशा अल्प माहितीमुळे त्यांचा दत्तावरचा विश्वासही थोडा-फारच असतो. दत्ताविषयी जास्त माहिती मिळाल्यास जास्त विश्वास निर्माण होण्यास साहाय्य होते आणि त्यामुळे साधनाही चांगली होते. आध्यात्मिक उन्नतीसाठी 'पिंडी ते ब्रह्मांडी' असा प्रवास करायचा असतो. म्हणजे 'ब्रह्मांडात', म्हणजे शिवात, जी तत्त्वे आहेत ती 'पिंडात', म्हणजे जिवात, यायला हवीत. तरच तो जीव शिवाशी एकरूप होऊ शकतो. पाण्याच्या थेंबात तेलाचा थोडासाही अंश असल्यास तो पाण्याशी एकरूप होऊ शकत नाही. त्याचप्रमाणे दत्तभक्तात दत्ताची सर्व वैशिष्ट्ये असल्याविना तो दत्ताशी एकरूप होऊ शकणार नाही; म्हणजेच त्याला सायुज्य मुक्ती मिळणार नाही. यासाठी या ग्रंथात प्रायः दत्ताविषयी इतरत्र बहुधा न दिलेली, पण उपयुक्त अशी पुढील अध्यात्मशास्त्रीय माहिती दिली आहे - दत्त, अवधूत, दिगंबर यांसारख्या नावांचा भावार्थ; दत्ताने केलेले गुणगुरु आणि साधकाने तसे गुणगुरु करण्याचे महत्त्व; दत्ताची कार्ये आणि वैशिष्ट्ये; दत्ताच्या परिवाराचा भावार्थ; मूर्तीविज्ञान; अतृप्त पूर्वजांच्या त्रासांपासून रक्षण होण्यासाठी दत्ताची उपासना करण्याची आवश्यकता आणि ती कशी करावी इत्यादी.

ही अध्यात्मशास्त्रीय माहिती दत्तभक्तांना आणि दत्ताची सांप्रदायिक साधना करणाऱ्यांना उपयुक्त ठरेल; परंतु सर्वसाधारण व्यक्तीने यासंदर्भात पुढील नियम लक्षात ठेवावा. श्री गणपति अथर्वशीर्ष वाचल्यावर श्री गणपतीची, शिवलीलामृत वाचल्यावर शिवाची आणि देवीमाहात्म्य वाचल्यावर देवीची उपासना करावी, असे काही जणांना वाटते. त्याच प्रकारे या ग्रंथातील दत्ताविषयीची माहिती वाचून आपणही दत्ताची उपासना लगेचच चालू करावी, असे त्यांना वाटण्याची शक्यता आहे. अशा व्यक्तींनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, दत्तासारख्या देवतेच्या उपासनेने

सगळ्यांचीच आध्यात्मिक उन्नती शीघ्र होत नाही; कारण तिची उपासना करणे त्यांना आवश्यक असले, तरच त्या उपासनेचा जास्त लाभ होतो अन्यथा भरपूर साधना करूनही फारच थोडी प्रगती होते. दत्तासारख्या देवतेची उपासना करणे आवश्यक आहे कि नाही, हे सर्वसाधारण मनुष्याला कळत नाही, तर अध्यात्मदृष्ट्या उन्नत असलेलेच सांगू शकतात; म्हणून सर्वसाधारण मनुष्याने केवळ माहिती म्हणूनच हा ग्रंथ वाचावा. दत्ताची अनुभूती येण्याच्या दृष्टीने साधनेचा पहिला टप्पा म्हणून आपल्या कुलदेवतेच्या नावाचा 'श्री... (कुलदेवी / कुलदेव यांच्या नावाचा चतुर्थीचा प्रत्यय)... नमः ।' या पद्धतीने नामजप करावा. त्याच्याच जोडीला अतृप्त पूर्वजांच्या त्रासांपासून रक्षण होण्यासाठी त्रासाच्या तीव्रतेनुसार दत्ताचा १ ते ६ घंटे (तास) नामजप प्रतिदिन करावा.

या ग्रंथात दिलेल्या काही अनुभूतींमध्ये 'प.पू. डॉक्टर' असा उल्लेख आलेला आहे, तो संकलकांपैकी परात्पर गुरु डॉ. जयंत बाळाजी आठवले यांच्याविषयी आहे.

हा ग्रंथ वाचून दत्तभक्तांची दत्तावरील श्रद्धा अधिक दृढ होवो आणि प्रत्येकालाच अधिकाधिक साधना करण्याची प्रेरणा मिळो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**

('अध्यात्मशास्त्र' या ग्रंथमालिकेतील सर्व खंडांचे सामाईक मनोगत 'धर्माचे मूलभूत विवेचन' या ग्रंथात दिले आहे.)

**टीप** ग्रंथातील काही सूक्ष्म-चित्रांत दर्शवलेल्या विविध स्पंदनांमुळे त्यातील मूळ रेखाचित्र सुस्पष्ट दिसत नाही. असे मूळ रेखाचित्रही संबंधित सूक्ष्म-चित्रापूर्वी देण्यात आले आहे.

सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या एक आध्यात्मिक उत्तराधिकारी श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ यांना पूर्वी सूक्ष्म-जगतातील एक विद्वान किंवा गुरुतत्त्व यांच्या माध्यमातून ज्ञान मिळायचे.